अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
जा.क्र. अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/प्र-९/६८५०
दिनांक :- ३१ / १२/२०२०

- आदेश –

विषय :- श्री.विजय विलास सुतार हुद्दा - अग्निशमन विमोचक (फायरमन), अग्निशामन व आपत्ती व्यवस्थापन विभाग, पुणे महानगरपालिका यांना कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर आस्थापनेवर कायमस्वरूपी बदलीने हजर होणेस कार्यमुक्त करणेबाबत.

संदर्भ :- १) श्री. विजय विलास सुतार (फायरमन) यांचा दि.२४.०५.२०१९ चा अर्ज.

२) अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय जा.क्र.अतिमआ (ज) /साप्रवि/आस्था ९/८३५० दि.०५.०२.२०२० चे पत्र.

३) क्र.पीएमसी - ३०१९/प्र.क्र.२९६/नवि - २२ नगरविकास विभाग, मंत्रालय,मुंबई दि.१६.१२.२०२०

४) मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांचा ठराव क्र.४७१ दि.३१ / १२ /२०२०.

पुणे महानगरपालिकेच्या अग्निशामन व आपत्ती व्यवस्थापन विभागाकडील श्री.विजय विलास सुतार, हुद्दा - अग्निशमन विमोचक (फायरमन) यांनी पुणे महानगरपालिकेतुन कोल्हापूर महानगरपालिकेकडील अग्निशमन विभागाकडे कायमस्वरूपी बदली करणे बाबतचा अर्ज संदर्भ क्र. १ अन्वये पुणे महानगरपालिकेच्या अग्निशामन व आपत्ती व्यवस्थापन कार्यालयाकडे केला होता.

श्री.सुतार (फायरमन) यांचे अर्जावर शासन स्तरावर निर्णय होणेचा प्रस्ताव मे. राज्य शासनाकडे संदर्भ क्र.२ अन्वये सादर करण्यात आला होता. संदर्भ क्र.३ अन्वये मे. राज्य शासनाचे खालीलप्रमाणे आदेश प्राप्त झाले आहेत,

१. आयुक्त कोल्हापूर महानगरपालिका,कोल्हापूर यांनी संदर्भ क्र.१ येथील पत्रान्वये तसेच अतिरिक्त आयुक्त,पुणे महानगरपालिका यांनी संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये दिलेली सहमती विचारात घेऊन श्री.विजय विलास सुतार, अग्निशमन विमोचक (फायरमन) पुणे महानगरपालिका यांच्या कौटुंबिक अडचणीस्तव बदलीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता.

२. संदर्भाधीन प्रस्तावाच्या अनुषंगाने श्री. विजय विलास सुतार, अग्निशमन विमोचक (फायरमन) पुणे महानगरपालिका यांना कोल्हापूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील रिक्त असलेल्या गट – क मधील अग्निशमन विमोचक (फायरमन) या तुलनेने कमी वेतनश्रेणी असलेल्या पदावर बदलीने नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे. संवर्ग बाह्य पदावरील नियुक्तीच्या अनुषंगाने वेतन निश्चितीच्या तरतुदी विचारात घेऊन त्यांचे वेतन निश्चित करण्यात यावे. अशी नियुक्ती झाल्यानंतर श्री.सुतार यांची कोल्हापूर महानगरपालिके मध्ये संवर्गातील जेष्ठता सर्वात कनिष्ठ (Zero Seniority)राहील.

३. उपरोक्त मंजुरीच्या अनुषंगाने आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे व आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांनी पुढील कार्यवाही करावी व शासनास अहवाल सादर करावा.

उपरोक्त शासन आदेशानुसार श्री. विजय विलास सुतार हुद्दा - अग्निशमन विमोचक (फायरमन) यांना पुणे महानगरपालिका सेवेतून दि.३१.१२.२०२० रोजी कार्यालयीन वेळेनंतर कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर येथे कायमस्वरूपी बदलीने हजर होणेसाठी कार्यमुक्त करणेस मंजुरी देण्यात येत आहे.

तरी, उपरोक्त मंजुरीनुसार पुढील आवश्यक कार्यवाही संबंधित खातेप्रमुख/विभागप्रमुख यांनी करावी आणि अहवाल सामान्य प्रशासन विभागास सादर करावा.

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिकाआयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

मा. महानगरपालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका
यांजकडेस माहितीस्तव सादर...